GOLDEN RESEARCH THOUGHTS

ISSN: 2231-5063
IMPACT FACTOR : 4.6052 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 9 | MARCH – 2017

# सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ आणि महिला

डॉ. एस. एन. गायकवाड
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, सांगली

**प्रस्तावना :**

विविध समाजसुधारकांनी स्त्री हक्कासाठी व जागृतीसाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले. स्त्री शक्तीची ताकद ओळखूनच महात्मा गांधींनी त्यांना भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सामील करून घेतले. गांधींच्या मते त्यांच्या शक्तीचा विकास करण्यासाठी त्यांना घराबाहेर पडणे गरजेचे आहे. त्यामुळेच गांधीनी मिठाच्या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजनी नायडू यांच्याकडे दिले.

महात्मा गांधींनी महिलांना मानवनिर्मित बंधने झुगारून देण्याचा सल्लाही दिला. यासाठी स्त्रीशिक्षण,



व्यावसाय शिक्षण, प्रौढ विवाह, आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह, पुनर्विवाह व समानता यांचे समर्थन केले[१].१९ व्या शतकात सर्वत्र अज्ञानाचे, विषमतेचे, धर्म रुढींचे साम्राज्य पसरले होते. पुरुषप्रधान समाजरचनेत स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व साफ नाकारले होते. स्त्री म्हणजे केवळ पुरुषाच्या वासनापूर्तीचे एक साधन असे मनूने म्हटल्यामुळे स्त्रीजातीचे अस्तित्वच संपुष्टात आले होते. अगदी प्राचीन काळापासून स्त्री ही गरीब गाय, पायाची दासी, अडचणीच्या वेळी देता घेता येण्यासारखी एक वस्तू असा सोयीस्कर विचार आणि आचार केला गेला[२]. या पार्श्वभूमीवर महिलांनी स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेणे भूमिगत होऊन या चळवळीसाठी मदत करणे, प्रसंगी पुरुषाच्या खांद्याल खांदा लावून लढणे या घटना धाडसाच्या होत्या. या कालखंडात सोलापूर जिल्ह्यातील महिलांनीही स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय सहभाग घेतलेला दिसतो.

## स्त्रियांच्या वेगळ्या परिषदा व कार्यक्रम:

१९३२ सालापासून कॉंग्रेस अधिवेशनात स्त्रियांच्या वेगळ्या परिषदा होऊ लागल्या होत्या. महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्वाने भाराऊन जावून प्रांतोप्रांतीच्या स्त्रिया सरकारविरोधी निदर्शने, प्रभातफेऱ्या सत्याग्रह, इत्यादी कार्यक्रमात भाग घेऊ लागल्या. काही स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत पतीला पूर्णतः भाग घेण्यास मुभा देऊन प्रपंच सांभाळीत होत्या. प्रसंगी सोलापूर जिल्ह्यातील श्रीमती विमल कोटणीस सारख्या स्त्रियांनी भूमिगत होऊन

स्वातंत्र्य चळवळीत काम केलेले दिसते. तर काही स्त्रिया आपल्या पतीबरोबर स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होत होत्या.

## सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या महिला सत्याग्रही :

सोलापूर जिल्ह्यातील पहिल्या महिला सत्याग्रही म्हणून श्रीमती रमाबाई पित्रे यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी १९३२ साली सत्याग्रहात भाग घेतला. त्यावेळी त्यांनी भाषणही केले होते. त्यांच्या भाषणापासून अनेक महिलांनी प्रेरणा घेतली होती. त्यांच्या देशप्रेमामुळे अनेक महिलांना उर्जा मिळाली होती. त्यांनी सत्याग्रहाबद्दल केलेल्या भाषणाबद्दल त्यांना दोन वर्षाची शिक्षा व पन्नास रुपयांचा दंडही भरावा लागला होता[३]. १९३० च्या जंगल सत्याग्रहात श्रीमती मीनाक्षी साने यांनी भाग घेतला होता. तसेच श्री जाजुजी यांच्या प्रेरणेमुळे मारवाडी समाजातील श्रीमती भागीरती जाजू, सीताबाई जाजू, आनंदीबाई जाजू, प्रा. सरोजनी डागा, श्रीमती पार्वती डागा यांनीही भाग घेतला. एकंदरीत परीस्थिती पाहता सोलापूर मध्ये महिलांमध्ये देशाभिमान जागृत होण्यासाठी श्रीमती रमाबाई पित्रे, मीनाक्षी साने, श्रीमती सीताबाई जाजू, पार्वती डागा, प्रा, सरोजनी डागा यांचे प्रयत्न मोलाचे आहेत असे म्हणावे लागते.

## तुरुंगाच्या दारावर तिरंगा फडकविला:

स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान पाहता त्याचे महत्व नाकारता येत नाही. अनेक महिलांकडून प्रेरणा घेऊन श्रीमती द्वारकाबाई देशपांडे यांनीही स्वतःला देशाच्या स्वातंत्र चळवळीत झोकून दिले. त्यांनी २६ जानेवारी १९४३ रोजी १२ महिला कैद्यांच्या समवेत तुरुंगाच्या दरवाजावर तिरंगा ध्वज फडकावण्याचे धैर्य दाखविले. त्यांच्या समवेत श्रीमती इंदुमती साळगावकर, श्रीमती कुसुरकर, सुभद्राबाई इर्लेकर, इत्यादी महिला सहभागी होत्या. श्रीमती कस्तुराबाई दोशी यांनी आपल्या तारुण्यातील बराच काळ तुरुंगात घालविला. स्वातंत्र्य संग्रामात आपल्या आयुष्यातील महत्वाची वर्षे व तारुण्यातील वर्षे तुरंगात घालवणाऱ्या श्रीमती कस्तुराबाई जोशी यांचा आदर्श वाखाणण्याजोगा आहे. त्यांनी आपल्या त्यागाने एक आदर्श घालून दिला. त्यामुळे तत्कालीन समाजात त्यांच्याबद्दल आदरभाव निर्माण होणे साहजिकच आहे. परिणामी अनेकांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात सक्रीय सहभाग घेतला. स्वातंत्र्य संग्रामात सुमतीबाई शहा, इंदिराबाई अंत्रोळीकर, जनाबाई जाधव इत्यादी महिलांचाही सहभाग होता. स्वातंत्र्य आंदोलनात सोलापुरातील महिला अग्रभागी होती. त्यांनी केलेल्या अलौकिक कामगिरीमुळे सोलापूरचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचले. सोलापुरात जे हुतात्मे झाले, त्यांच्या पत्नींचे योगदान या चळवळीसाठी महत्वाचे होते. त्यामध्ये निल्लवाबाई धनशेट्टी, राहीबाई शिंदे, रमाकुवरजी सारडा, इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या कार्यामुळे या परिसरातील अनेक महिला या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या.तसेच सोलापूरच्या कुसुम रसाळे, श्रीमती लीलावती शहा, रमाबाई जमादार, कुर्डूवाडीच्या हिराबाई गांधी, पुष्पाताई चिंदरकर इत्यादींनी स्वातंत्र्य चळवळीच्या विविध कार्यक्रमात भाग घेऊन स्वातंत्र्य चळवळीत आपले योगदान दिले.

### महिलांचे भूमिगत चळवळीत कार्य :

स्वातंत्र्याच्या चळवळीत सर्वच स्त्रिया उघडपणे सक्रीय सहभाग घेऊ शकत नव्हत्या, त्यामुळे काही स्त्रिया भूमिगत राहून आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत होत्या. त्यामध्ये सोलापूरच्या स्त्रियाही मागे नव्हत्या. डॉ. वत्सला आपटे या तरुणीने भूमिगत राहून बुलेटीन वाटणे, सत्याग्रहींचे जेवण पोहोचविणे व गुप्त संदेश पोहोचविणे यासारखी कामे केलेली दिसतात[४]. ही कामे करीत असतानाच त्या पकडल्या गेल्या. त्याचबरोबर श्रीमती विमल कोटणीस यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य आंदोलनात भूमिगत राहून आपल्या जीवावर उदार होऊन सत्याग्रहींना मोठ्या प्रमाणात मदत केली. तसेच श्रीमती जुगनू बायस, इंदुमती कवडे, इंदुताई शेंडे, कलावती लिमकर, रमाबाई चितळे, इंदिरा तांबेकर, इत्यादी महिलांनी भूमिगत लोकांना मोलाचे सहकार्य केले. श्रीमती निर्मलाराजे भोसले या तर अक्कलकोट संस्थानातील एक स्त्री, हे संस्थान सोलापूर जिल्ह्यातील जुने संस्थान असून आकाराने व उत्पन्नाने ते सर्वात मोठे संस्थान होय[५]. यांनीही स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेला दिसतो. याचबरोबर जिल्ह्यातील अनेक ज्ञात व अज्ञात महिलांनी देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला भरीव योगदान दिले आहे.

थोडक्यात इ.स. १९२० नंतर राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे महात्मा गांधी यांच्या हाती आलेली होती. त्यांच्या कार्य करण्याच्या पध्दतीमुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे एक वेगळे दर्शन जगाला पहायला मिळाले. भारतीय मालावरील बहिष्कार, स्वदेशीचा वापर व ग्रामोद्योगाचा पुरस्कार, अहिंसक सत्याग्रहाचे प्रभावी दर्शन, यामुळे सर्वसामान्य जनतेपर्यंत स्वातंत्र्य आंदोलनाचे लोण सक्षमपणे पोहचविण्यात गांधीजी कमालीचे यशस्वी झालेले दिसतात. त्यामुळे संपूर्ण देशाला स्वातंत्र्य लढयाचे व राष्ट्रीय एकात्मतेचे तेजस्वी दर्शन घडून आले.

या स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासात सोलापूर जिल्ह्याने मानाचे स्थान पटकावले आहे. असहकार व कायदेभंग आंदोलनाच्या वेळी सोलापूर शहराने स्थानिक काँग्रेस नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी सत्तेचे जोखड फेकून देऊन चार दिवस स्वातंत्र्य भोगले. 'गांधी राज्य' या नावाने सोलापूरच्या पराक्रमाची व देशभक्तीची नोंद इतिहासाला घावी लागली. या घटनेने ब्रिटिशांच्या राज्यासिंहासनाला हादरा बसला. त्याचे पडसाद संपूर्ण जगभर उमटले.

### संदर्भ :

१. काकोडकर जे. आर. (संपा.), गांधीजी : महात्मा आणि राष्ट्रपिता, भारतीय विद्याभवन प्रकाशन, पुणे. २००२, पृष्ठ. क्र. १२.

२. माळी म.गो. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, आशा प्रकाशन, गारगोटी, १९८१, पृष्ठ. क्र. २.

३. येवले शं. भा. सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई, पृष्ठ क्र. ८५.

४. कित्ता.

५. देशपांडे गोपाळ, सोलापूर जिल्ह्याचा इतिहास, कौशल्य प्रकाशन सोलापूर, २०१२. पृष्ठ. क्र.२२९.